नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - ३२ Issue - 32 | वार बुधवार दि. १८ जून २०२५ Blow- Wednesday Date 17 June 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# जल जीवन मिशन कामाच्या बीलवर सही साठी उपअभियंता राठोड टक्केवारी वसुलीत व्यस्त, कामाची क्वॉलिटी तपासणार कोण ?

## 'तेरी भी चूप मेरी भी चूप' ठेकेदार अधिकाऱ्याचे खेळ चालू

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट ( विशेष प्रतिनिधी )

अक्कलकोट तालुक्यातील जल जीवन मिशन अंतर्गत चालू असलेल्या कामात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार चालू असून कामाची पाहणी न करता कार्यालयात बसून आर्थिक व्यवहार करून बिलवर सही करण्यात उप अभियंता राठोड व्यस्त असल्याचे दिसून येत आहे.

वागदरी, सदलापूर, बोरगाव, गोगांव, किरनळी, शिरवळ वाडी यासह तालुक्यातील विविध गावात जल जीवन मिशन अंतर्गत 'हर घर नल हर घर जल' योजना चालू आहे सदर कामाचे देखरेख नियंत्रण ठेवण्यासाठी गावपातळीवर एक समिती असून सदर समितीस आजतागायत कुठलीच माहिति ठेकेदार अगर अधिकारी यांनी सांगितले नाहीत सदर कामाचे माहिति ग्रामस्थ यांना कळावे यासाठी सविस्तर माहिति फलक ला- वणे गरजेचे असताना ते लावलेले दिसून येत नाही.



जल जीवन मिशन अंतर्गत पाणी पुरवठा कामात मोठा प्रमाणात भ्रष्टाचार करून निकृष्ट दर्जाची कामे तालुक्यातील विविध गावात झाल्याची माहिती व तक्रार वाढत आहेत. आलेल्या तक्रारींची चौकशी करून कार्यवाही करण्याचे काम उप अभियंता राठोड यांचे असताना सदर अर्ज ठेकेदार यांना दाखवून स्वतःचे टक्केवारी वाढ करून घेत असल्याचे माहिती नाव न छापण्याच्या अटीवर ठेकेदार आमच्या प्रतिनिधीशी बोलताना सांगितले.

**भाग - १**

यावरूच कळतंय की, उप अभियंता अर्थपूर्ण व्यवहारातून कामाकडे दुर्लक्ष करून बसल्या ठिकाणी टक्केवारी वाढ तर कामाची गुणवत्ता वाढ अशी गत या कार्यालयाची व अधिकारी यांची झाली आहे. अक्कलकोट तालुक्यातील सर्व जल जीवन मिशन अंतर्गत मंजूर कामाचे चौकशी साठी समिती नेमणूक करून सर्व कामाची क्वॉलिटी कंट्रोल कडून गुणवत्ता तपासणी करून संबंधित उप अभियंता राठोड यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात यावी, असे जनतेतून मागणी होत आहे.

> **तालुक्यातील सर्व जल जीवन मिशन अंतर्गत मंजूर कामाचे चौकशी समिती नेमणूक करून निश्चित पणे चौकशी केली जाईल. २ सदस्य समिती नेमून चौकशी केली जाईल असे आमच्या प्रतिनीधीशी बोलताना कार्यकारी अभियंता संजय धनशेट्टी यांनी सांगितले.**

मौजे गोगांव येथे जल जीवन मिशन अंतर्गत पाणी पुरवठा काम चालू असून भुरीकवठे येथील तलावापासून पाईप लाईन काम चालू असून त्या खड्याची उची अर्धा फूट असून वड्यामधील पाइपलाइन पाऊस आलं की वाहून जाईल अशी गत झाली आहे. याबाबत काटकर नावाच्या अधिकारी यांना ग्रामपंचायत प्रत्यक्ष कामाची पाहणी करून कार्यवाही करण्याबाबत लेखी तक्रार देऊन ही अद्याप कुठलीच कार्यवाही झालेले नाहीत. टक्केवारी वाढ करून अधिकारी 'तेरी भी चूप मेरी भी चूप' असे केल्याचे जनतेतून चर्चा चालू आहे. गेल्या दोन वर्षापासून उन्हामध्ये व पाऊसामध्ये सडलेले पाईपचे वापर करत असताना कनिष्ठ अभियंता काटकर यांनी बघ्याची भूमिका घेतल्याचे दिसून येत आहे. याबाबत लेखी तक्रार करून ही अद्याप कार्यवाही करण्यात आले




नाहीत व गोगांव गावामध्ये दादा जगताप घर ते मजीद पर्यंत सिमेंट कॉँक्रिट रस्ता फोडून काम केले असून त्याचे बील काढण्यात आले. बील मध्ये उलेख केलेले बाबी त्याठिकाणी करण्यात आले नाही. रस्ता फोडण्यात आले त्यावर सिमेंट कॉँक्रिट न करता नावाला देखावा करून काम केल्याचे दाखवून बील काढण्यात आले होते त्यावेळी राठोड यांनी किती टक्केवारी घेतले हे जाहीर करणार का? नाहीतर जनतेने त्याच्या कार्यालयावर मोर्चा काढून घेतलेल्या टक्केवारी मधून सिमेंट कॉँक्रिट रस्ता करण्यासाठी चिखलफेक मोर्चा गोगाव ग्रामस्थ करतील. असे लोकांतून चर्चा आहे. सदर ठिकाणी सध्या चिखलाचे साम्राज्य झाले असून लोक जीव मुठीत धरून चालत आहे मोटार सायकल स्लिप होऊन अपघात होण्याचे शक्यता असून त्या ठिकाणी जीव गेल्यास ठेकेदार, उपअभियंता राठोड यांना जबाबदार धरून कार्यवाही करावे यासाठी लेखी तक्रार ग्रामस्थ देत आहेत.




सदर सिमेंट कॉँक्रिट रस्ता फोडल्या नंतर त्याठिकाणी सिमेंट कॉँक्रिट करणे आवश्यक असताना केवळ बील काढण्यासाठी मलम पट्टी लावले आहे. त्याठिकाणी उपअभियंता पाहणी करून बील वर सही केले की, ऑफिस मध्ये बसून आर्थिक वाटाघाटी करून सही केले यांची ही चौकशी करून संबधित जबाबदार अधिकारी राठोड यांच्यावर कार्यवाही करण्याची मागणी ग्रामस्थ करीत आहे.

# मंत्रीमंडळाच्या बैठकीत कृषीसाठी एआय धोरण मंजूर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्याच्या कृषि क्षेत्राला डिजिटल युगात अग्रेसर ठेवणाऱ्या महाराष्ट्र कृषि-कृत्रिम बुद्धिमत्ता महाग्री-एआय धोरण २०२५-२०२९ या धोरणास आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय), निर्मितीक्षम कृत्रिम बुद्धिमत्ता, इंटरनेट ऑफ थिंग्ज , ड्रोन, संगणकीय दृष्टिक्षमता, रोबोटिक्स आणि पूर्वानुमान विश्ले-षण यांसारख्या उदयोन्मुख तंत्रज्ञानाच्या मदतीने शाश्वत व विस्तारयोग्य उपाययोजना राबविता येणार आहेत.

राज्यातील ग्रीस्टॅक, महा-ग्रीस्टेक, महावेध, क्रॉपसॅप, गमार्कनेट, डिजिटल शेतीश-ाळा, महा-डिबीटी यांसारखे प्रकल्प पुढे नेण्यास मदत होणार. या धोरणाच्या अंमलबजावणीसाठी त्रिस्तरीय प्रशासकीय संरचना असेल. या धोरणाच्या अंमलबजावणीसाठी पहिल्या तीन वर्षांसाठी ५०० कोटी रूपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात येईल. कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्र वेगाने बदलण-ारे आहे. त्यामुळे पुढील पाच वर्षात या धोरणामध्ये आवश्यक ते बदल / सुधारणा करण्यात येतील. त्यासाठी राज्यस्तरीय सुकाणू समिती, राज्यस्तरीय तांत्रिक समिती, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि ॲग्रीटेक नाविन्यता केंद्र, कृषि विद्यापीठांतर्गत कृषि कृत्रिम बुद्धिमत्ता संशोधन व नाविन्यता केंद्र काम करतील.

या धोरणाच्या माध्यमातून राज्यात कृषि क्षेत्रातील कृत्रिम बुद्धिमत्ता व नाविन्यतेसाठी एक अग्रगण्य केंद्र निर्माण होईल. या धोरणामुळे कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाचा शेतकरी-केंद्रित वापर, संशोधन, डेटा देवाण-घेवाण वाढेल, स्टार्ट-अप्सना पाठबळ मिळेल आणि यातून महाराष्ट्र डिजिटल कृषि नाविन्यतेमध्ये आघाडीवर राहील, अशी अपेक्षा आहे.

या धोरणाद्वारे कृत्रिम बुद्धिमत्ता आणि उदयोन्मुख तंत्रज्ञानाचा शेतकरी-केंद्रित वापर करण्यास स्टार्टअप्स, खाजगी कंपन्या / तंत्रज्ञान कंपन्या, कृषि विद्यापीठे, संशोधन संस्था, कृषि विज्ञान केंद्रे, खाजगी संस्था, शेतकरी / शेतकरी उत्पादक संस्था आदींना चालना मिळेल, असे उपक्रम हाती घेतले जातील. यात कृत्रिम बुद्धिमत्ता आणि ॲग्रीटेक नाविन्यता केंद्राची संस्थात्मक उभारणी केली जाईल. हे केंद्र या धोरणाच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीसाठी स्वतंत्र, पूर्णवेळ कार्यान्वयन यंत्रणा म्हणून कार्य करेल. ही यंत्रणा राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय संस्थांसोबत भागीदारी, नवकल्पनांना प्रोत्साहन, प्रकल्पांची निवड, अंमलबजावणी व अर्थसहाय्य, समन्वय, क्षमता बांधणी इ. धोरणांतर्गत विविध बाबींवर काम करेल. आयआयटी / आयआयएस्सी सारख्या संस्थांच्या मार्गदर्शनाखाली राज्यातील चार कृषि विद्यापीठांमध्ये कृषि-कृत्रिम बुद्धिमत्ता नाविन्यता आणि इनक्युबेशन केंद्र स्थापण्यात येतील. डेटा-आधारित शेती आणि कृत्रिम बुद्धिमत्ता वापरासाठी उपयोगी ठरतील अशा डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधा उभारल्या जातील. या सुविधा राज्यव्यापी, सुरक्षित, सुसंगत व संमती-आधारित डेटा देवाण-घेवाण सुलभ करतील. क्लाऊड आधारित कृषि डेटा एक्स्चेंज आणि सँडबॉक्सिंग सुविधा उपलब्ध केली जाईल, या डिजिटल प्लॅटफॉर्मशी केंद्र व राज्य शासनाचे शेती संबंधीत सर्व डेटाबेस जोडण्यात येतील .

## आणीबाणीत कारावास भोगलेल्यांच्या मानधनात दुप्पटीने वाढ

मुंबई : सन १९७५ ते १९७७ मधील आणीबाणीच्या कालावधीत लोकशाहीकरिता लढा देताना कारावास भोगावा लागलेल्यांना आता वाढीव मानधन मिळणार आहे. तसेच मानधनधारकाच्या हयात जोडीदारालाही मानधन देण्याचा आणि अन्य काही अटी शिथिल करण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. देशात २५ जून, १९७५ ते ३१ मार्च, १९७७ या कालावधीत आणीबाणी घोषित करण्यात आली होती. या कालावधीत लोकशाहीकरिता लढा देणाऱ्यांना कारावास भोगावा लागला. अशा व्यक्तींच्या सन्मानार्थ, त्यांचा यथोचित गौरव करण्यासाठी २०१८ मध्ये दरमहा मानधन देण्याचे धोरण निश्चित करण्यात आले आहे. या मानधनात वाढ करण्याचा निर्णय आज मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला, त्यानुसार आणीबाणीच्या काळात एक महिन्यापेक्षा जास्त कारावास भोगलेल्यांना दरमहा वीस हजार रूपये व त्यांच्या पश्चात पत्नीस किंवा पतीस दरमहा दहा हजार रूपये मानधन देण्यात येईल. एक महिन्यापेक्षा कमी कारावास भोगलेल्या आणीबाणीधारकांना दरमहा दहा हजार रूपये तर त्यांच्या पश्चात पत्नीस किंवा पतीस पाच हजार रूपये मानधन देण्यात येईल. हयात असलेल्या जोडीदारास मानधनासाठी संबंधित जिल्हाधिकारी यांचेकडे नव्याने अर्ज करणे आवश्यक आहे. तसेच आणीबाणीच्या काळात कारावास भोगलेली व्यक्ती २ जानेव-ारी, २०१८ पूर्वी हयात नसल्यास त्याच्या पश्चात त्याच्या जोडीदारास शपथपत्र जोडून अर्ज करता येणार आहे. यासाठीची मुदत याबाबतचा शासन निर्णय जाहीर झाल्यापासून ९० दिवसांचा राहणार आहे. या योजनेंतर्गत अर्ज करण्यासाठी यापूर्वी अटकेच्या वेळी किमान वय १८ असणे आवश्यक होते, ही अट रद्द करण्यात आली आहे.



## संपादकीय....

# दिलासादायक निर्णय

राज्यमंत्रिमंडळाच्या बैठकीत विविध निर्णय घेण्यात आल्याने शेतकऱ्यांसह हितासह अनेक निर्णय घेतल्याने दिलासा मिळाला आहे. राज्याच्या कृषि क्षेत्राला डिजिटल युगात अग्रेसर ठेवणाऱ्या महाराष्ट्र कृषि-कृत्रिम बुद्धिमत्ता महाग्री-एआय धोरण २०२५-२०२९ या धोरणास आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली. कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय), निर्मितीक्षम कृत्रिम बुद्धिमत्ता, इंटरनेट ऑफ थिंग्ज , ड्रोन, संगणकीय दृष्टिक्षमता, रोबोटिक्स आणि पूर्वानुमान विश्लेषण यांसारख्या उदयोन्मुख तंत्रज्ञानाच्या मदतीने शाश्वत व विस्तारयोग्य उपाययोजना राबविता येणार आहेत. राज्यातील ग्रीस्टॅक, महा-ग्रीस्टेक, महावेध, क्रॉपसॅप, गमार्कनेट, डिजिटल शेतीशाळा, महा-डिबीटी यांसारखे प्रकल्प पुढे नेण्यास मदत होणार. या धोरणाच्या अंमलबजावणीसाठी त्रिस्तरीय प्रशासकीय संरचना असेल. या धोरणाच्या अंमलबजावणीसाठी पहिल्या तीन वर्षांसाठी ५०० कोटी रूपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात येईल. तसेच सन १९७५ ते १९७७ मधील आणीबाणीच्या कालावधीत लोकशाहीकरिता लढा देताना कारावास भोगावा लागलेल्यांना आता वाढीव मानधन मिळणार आहे. तसेच मानधनधारकाच्या हयात जोडीदारालाही मानधन देण्याचा आणि अन्य काही अटी शिथिल करण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. देशात २५ जून, १९७५ ते ३१ मार्च, १९७७ या कालावधीत आणीबाणी घोषित करण्यात आली होती. या कालावधीत लोकशाहीकरिता लढा देणाऱ्यांना कारावास भोगावा लागला. अशा व्यक्तींच्या सन्मानार्थ, त्यांचा यथोचित गौरव करण्यासाठी २०१८ मध्ये दरमहा मानधन देण्याचे धोरण निश्चित करण्यात आले आहे.




# जिल्हा परिषद शाळेत प्रवेश घ्या घरपट्टीत ५० टक्के सुट मिळवा

## भादाणे ग्रामपंचायतीचा स्तुत्य उपक्रम

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : ग्रामीण भागातील जिल्हा परिषद मराठी शाळेतील घटती पटसंख्या लक्षात घेता मराठी शाळा वाचवणे गरजेचे आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनीं जिल्हा परिषद शाळेत प्रवेश घेतल्यास घरपट्टी करात ५० टक्के सवलत देण्याचा ठराव भिवंडी तालुक्यातील भादाणे ग्रामपंचायतीने केला आहे. जिल्हा परिषद शाळेचे भवितव्य टीकवण्यासाठी व विद्यार्थ्यांना शाळेची ओढ निर्माण व्हावी याकरिता सरपंच जोत्ना भालेकर, उपसरपंच मेघा भोईर, ग्रामपंचायत अधीकारी मधुकर जाधव व ग्रामपंचायत कमीटी यांच्या मार्गदर्शनाखाली नुकत्याच पार पडलेल्या मासीक सभेत ग्रामपंचायत हद्दीतील भादाणे, जुपाडा, आतकोली, चिंबीपाडा, शेरेकरपाडा, या गावातील जिल्हा परिषद शाळेत विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतल्यास पालकांना त्यांच्या घरपट्टीत (मालमत्ता कर) यांच्यात ५० टक्के सवलत देण्यात येणार असुन १ ली ते ४ थी च्या विद्यार्थ्यांना ५ वृक्ष (झाडे) देण्यात येणार असुन त्यांची योग्य रित्या निगा राखुन झाडे जगविल्यास पुढील वर्षी त्यांच्या पालकांना सुध्दा घरपट्टी (मालमत्ता कर) पाणीपट्टी (पाणीकर) यांच्यात ५० टक्के सवलत देण्याचा ठराव ग्रामपंचायतीच्या वतीने करण्यात आला. या ठरावाचे नागरीकांकडुन स्वागत करण्यात येत असुन ग्रामपंचायत भादाणे यांच्या या स्तुत्य उपक्रमाबद्दल सर्वत्र त्यांचे अभिनंदन होत आहे. तसेच नागरीकांनी या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा असे आवाहन ग्रामपंचायतीच्या वतीने करण्यात आले आहे.

# कोकण सुपुत्र केतन भोज, शांताराम गुडेकर, दिपक कारकर, निलेश कोकमकर आदर्श पत्रकार पुरस्कार - २०२५ ने सन्मानित

## वर्धापनदिनी कर्तृत्ववान व्यक्तीमत्वांचा सन्मान; पत्रकार, कलावंतांच्या पाठीवर शाबासकीची थाप







**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई/प्रतिनिधी : ठाणे जिल्ह्यातील ग्रामीण भागात सुरु झालेल्या आणि अल्पावधीतच ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग आणि नाशिक जिल्ह्यात पोहोचलेल्या दै. अग्रलेखचा चौथा वर्धापनदिन रविवारी (दि.१५) कल्याणमधील के.सी. गांधी ऑडिटोरियममध्ये मोठ्या जल्लोषात साजरा झाला. विविध क्षेत्रांत कर्तृत्व गाजवणाऱ्या मान्यवरांना 'दै. अग्रलेख सन्मान २०२५' हा मानाचा पुरस्कार देवून व पत्रकार, नाट्य कलावंतांना सन्मानित करुन दैनिक अग्रलेखने चौथ्या वर्धापनदिनी अनोखा पायंडा पाडला.

मुंबईत नामांकित पत्रकारांच्या मुशीत तयार झालेल्या उमेश मारुती भेरे यांनी चार वर्षांपूर्वी शहापुरमध्ये दै. अग्रलेख हे दैनिक वृत्तपत्र सुरु केले. अभ्यासपूर्ण व सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या दखलपात्र बातम्या, अग्रलेख, विविध विषयांचा वेध घेणारी सदरे, वात्रटिका यांमुळे अल्पावधीतच लोकप्रिय बनलेल्या दैनिक अग्रलेखने ४ वर्षांचा यशस्वी पल्ला गाठला.या चौथ्या वर्धापनदिन कार्यक्रम जिजाऊ संस्थेचे संस्थापक अध्यक्ष निलेश भगवान सांबरे यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या या सोहळ्यात रुग्णसेवक अजित जाधव, मुंबई म्युनिसिपल को. ऑपरेटिव्ह बँकेचे संचालक भानुदास भोईर,अभिनेते सुभाष शिंदे,पत्रकार सुबोध रणशेवरे,वैद्यकीय अधिकारी डॉ. तरुलता धानके, समाजसेविका डॉ. पद्मिनी कृष्णा, साहित्यिक संतोष जाधव, लेखक, अभिनेता दिपक खांडेकर यांना मान्यवरांच्या हस्ते 'दै. अग्रलेख सन्मान २०२५' हा मानाचा पुरस्कार देवून गौरवण्यात आले. दैनिक अग्रलेखच्या वाटचालीत मोलाचे योगदान देणाऱ्या पत्रकारांचा आदर्श पत्रकार पुरस्कार देवून सन्मान करण्यात आला.या पुरस्कार वितरण समारंभात कोकणचे सुपुत्र समाजसेवक आरटीआय कार्यकर्ता केतन भोज, शांताराम गुडेकर, दिपक कारकर, निलेश कोकमकर यांना आदर्श पत्रकार पुरस्कार -२०२५ देऊन मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

रत्नागिरी जिल्ह्यातील लांजा तालुक्यामधील कोचरी गावातील सुपुत्र कु. केतन भोज यांचा हा सातवा पुरस्कार असून ते आरटीआय कार्यकर्ता आहेत.शिवाय कोकणच्या समस्यांवर लेखन करून त्यांचा पाठपुरावा सातत्याने ते करत आहेत.महाराष्ट्र हरित सेना,वन विभाग महाराष्ट्र शासनचे ते सदस्य आहेत.कोकणातील अनेक समस्या वर्तमान पत्रात मांडून त्यांना मार्गी लावण्यात केतन भोज अग्रेसर आहेत. त्यांना मुख्यमंत्री,महाराष्ट्र राज्य यांच्या सहीचे सोशल मिडिया महामित्र हे सन्मानपत्रही प्राप्त झालेले आहे. शिवाय ते विविध संस्था,पत्रकार संघटना, वृत्तपत्र लेखक संघ,मंडळ यांचे पदाधिकारी असून हातात घेतलेलं प्रत्येक काम पूर्ण करण्यात ते यशस्वी झालेले आहेत.आजवर अनेक पुरस्कार त्यांना प्राप्त झालेले आहेत.

रत्नागिरी जिल्ह्यातील संगमेश्वर तालुक्यामधील देवरुख शहरापासून जवळच असलेल्या सह्याद्रीचा प्रतिकैलास श्रीक्षेत्र मार्लेश्वर परिसरातील आंगवली-रेवाळेवाडीचे सुपुत्र विक्रोळी पश्चिम पार्क साईट येथील रहिवासी दै. अग्रलेखचे मुंबई/कोकण विभागीय संपादक, वृत्तपत्रलेखक शांत्ताराम लक्ष्मण गुडेकर ( ए.ड.ए.ज)यांची जॉय सामाजिक संस्था मुंबई(रजि.)तर्फे आदर्श पत्रकार पुरस्कार -२०२५ प्राप्त झाला असून त्यांना दै. अग्रलेख तर्फेआदर्श पत्रकार पुरस्कार-२०२५ प्राप्त झाल्याबद्दल त्यांचे अनेकांनी अभिनंदन केले.

शांत्ताराम गुडेकर यांना महाराष्ट्र शासनाने विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून २०१२ ते २०१७ या काळावधीसाठी नियुक्त केले होते.त्यांना डॉ.बाबासाहेब आंबेडकर फ़ॅलोशिप पुरस्कार -दिल्ली प्राप्त झालेला आहे.ते महाराष्ट्र शासनाच्या नागरी संरक्षण दल-एन विभाग-क्षेत्र-३ मध्ये स्वयंसेवक म्हणून कार्यरत होते.शिवाय महाराष्ट्र शासन अनुदानित नशाबंदी मंडळ- महाराष्ट्र राज्य या मंडळतर्फे नशाबंदी चे काम करतात.कोकण विभाग पत्रकार संघ मुंबई जिल्हा सचिव म्हणून ते काम पाहिले असून त्यांना नगर मित्र,आदर्श समाजसेवक ,समाजरत्न , दक्ष नागरिक ,कोकण भूषण ,वृत्तदिप पुरस्कार ,महापौर गौरवपत्र तसेच सोनी टि.व्ही वरील सी.आय.डी मालीकेला वर्धापनदिनानिमि आयोजित कार्यक्रमात शांत्ताराम गुडेकर यांना स्थानिक हिरो सी.आय.डी मेडल व सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आलेले आहे.शांताराम गुडेकर महाराष्ट्र हरित सेना, वन विभाग, महाराष्ट्र शासन चे सदस्य, माझी वसुंधरा, महाराष्ट्र शासन चे सदस्य आहेत. शिवाय माहिती अधिकार, पोलीस मित्र, पत्रकार संरक्षण सेना चे मुंबई जिल्हा प्रसिद्धी प्रमुख आहेत.अखिल भारतीय पत्रकार हक्क संसद समिती चे मुंबई उपनगर सचिव आहेत.

पत्रकार दिपक कारकर उत्तम सूत्रसंचालक असून कोकणातील शक्ती-तुरा, नमन, नाटक आदी लोककलेना मुंबई रंग मंचावर व्यासपीठ उपलब्ध करून देण्यात अग्रेसर आहेत. ते श्री पानबुडी देवी कलामंच आणि सहकारी यांच्या माध्यमातून विविध कार्यक्रम आयोजित करत असतात.कोकणातील सर्व क्षेत्रातील दुर्लक्षित असलेल्या कलाकारांना पुढे आणण्यात दिपक कारकर पुढे असतात. पत्रकार म्हणून कोकण विभागातील अनेक समस्या, जनजागृती करणारे लेखन ते सतत करत असतात. ते एक उत्तम कलाकार ही आहेत. सर्वांना सोबत घेऊन काम करणे ते जास्त पसंद करतात. आजवर अनेक पुरस्कार त्यांना प्राप्त झालेले असून ते विविध मंडळ, ग्राम, मुंबई विभागातील संस्था, समाज मंडळ वर पदाधिकारी म्हणून उत्तम काम करत आहेत.

निलेश कोकमकर पत्रकार असून रक्तदानचे महत्व पटवत स्वतः रक्तदान करतात.शिवाय जनजागृती करत रक्तदान विषयी प्रचार आणि प्रसार करत आहेत. रक्तदान हे महानदान मानले जातेच त्याच मूळ कारण आपलं रक्तदान म्हणजेच इतरांना जीवनदान,कधी कधी जिथं रक्ताची नाती सुद्धा तयार होत नाहीत तिथं अनेक रक्तदाते एखाद्याला जीवनदान देण्याकरता तत्पर असतात हे म्हणावं लागेल.वर्षभर अनेक ब्लड कॅम्प तसेच नवनवीन रक्तदात्यांना प्रेरित करुन रक्तदान करण्यास प्रवृत्त केल्याबद्दल विविध संस्था, मंडळ, ब्लड बँक तर्फे निलेश कोकमकर यांना सन्मानित केले आहे.ते विविध मंडळ, ग्राम, समाज मंडळ, युवा मंडळ मध्ये कार्यरत असून त्या माध्यमातून सामाजिक कार्य करत आहेत.

ग्रामीण कला मंच या नाट्यक्षेत्रातील नामवंत संस्थेच्या व्यासपीठावर विविध नाटके सादर करणाऱ्या कलावंतांना सन्मानपत्र देवून त्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप देण्याचा स्तुत्य उपक्रम याप्रसंगी संपादक उमेश भेरे व कार्यकारी संपादक मैथिली भेरे यांनी राबवला. दैनिक अग्रलेखने शहापुरमधील सामाजिक प्रश्नांवर लोकजागृती करण्याच्या उद्देशाने आयोजित केलेल्या खुल्या निबंध स्पर्धेचा पारितोषिक प्रदान सोहळाही यावेळी संपन्न झाला. उपस्थित मान्यवरांनी संपादक उमेश भेरे यांच्या व दै. अग्रलेखच्या यशस्वी वाटचालीबद्दल अभिनंदन करत भेरे यांच्या अग्रलेखांचे व वात्रटिकांचे विशेष कौतुक केले.

याप्रसंगी उत्तर भारतीय एज्युकेशन ऍण्ड रिसर्च इन्स्टिट्यूटचे अध्यक्ष डॉ. विजय पंडित, निर्माता-दिग्दर्शक राकेश राऊत, ह. भ. प. कैलास महाराज निचिते, कोकण कुणबी महोत्सव समितीचे अध्यक्ष रविंद्र चंदे, शहापूर कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक विनायक सापळे, क्रूगर व्हेंटीलेशनचे जनरल मॅनेजर संपत शेंडगे, उद्योजक अशोक सांगळे, पालघर जिल्हा परिषदेचे आरोग्य व बांधकाम समिती सभापती संदेश ढोणे इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

केतन भोज, शांताराम गुडेकर, दिपक कारकर, निलेश कोकमकर यांना आदर्श पत्रकार पुरस्कार -२०२५ प्राप्त झाल्याबद्दल अनेकांनी अभिनंदनासह शुभेच्छा दिल्या आहेत.या सोहळ्याचे प्रास्ताविक संपादक उमेश भेरे यांनी तर सूत्रसंचालन नितीन गाडेकर व संतोष दवणे यांनी केले.

# मौजे कोर्टी येथे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर उत्साहात संपन्न



## शिबिरात ४६७ लाभार्थ्यांनी घेतला लाभ

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : शासनाच्या विविध योजनांचा लाभ लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी मौजे कोर्टी, ता. पंढरपूर येथे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियानाचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात एकूण ४६७ लाभार्थ्यांनी विविध योजनांचा लाभ घेतला असल्याची माहिती तहसिलदार सचिन लंगुटे यांनी दिली.

महसूल विभागांतर्गत क्षेत्रीय स्तरावर पंढरपूर तालुक्यातील ग्रामीण भागात सर्वसामान्य जनता, शेतकरी, विद्यार्थी व महिला यांचे विभागांशी संबंधित दैनंदिन प्रश्नांची निराकरण करणे व जनतेच्या तक्रारी सत्वर निकालात काढणे. तसेच महसूल प्रशासन अधिक लोकाभिमुख, कार्यक्षम व गतिमान करण्यासाठी कोर्टी, ता. पंढरपूर येथे शिबीराचे आयोजन करण्यात आले होते.

आमदार समाधान आवताडे, प्रांताधिकारी सचिन इथापे व इतर मान्यवरांच्या हस्ते प्रतिनिधिक लाभांचे वाटप करण्यात आले.

सदर शिबीरात महसूल विभागाच्या ३०६ लाभार्थ्यांनी उत्पन्नाचे दाखले, जातीचे दाखले, नॉनक्रिमिलेयर दाखले, वय व अधिवास दाखले तसेच चार इतर दाखले आदी योजनांचा लाभ घेतला त्याचबरोबर पुरवठा विभागाकडून ५१ शिधापत्रिका ,त्याचबरोबर कृषी विभागाकडून १७ लाभार्थ्यांना लाभ देण्यात आला. कोर्टी ग्राम पंचायतीकडून १४ घरकुले व १० जॉबकार्डचा लाभ देण्यात आला. आरोग्य विभागाच्या माध्यमातून ६४ तर लेक लाडकी योजनेतून ५ लाभार्थ्यांना लाभ देण्यात आला.

सदर शिबीरात शासनाच्या विविध विभागांनी एकत्रितपणे सेवा उपलब्ध केल्याने ग्रामीण भागातील नागरिकांना गावातच प्रशासनाची सेवा मिळाल्यामुळे समाधान व्यक्त केले असल्याची माहिती तहसिलदार श्री. लंगुटे यांनी दिली. या शिबीरास गटविकास अधिकारी सुशील संसारे, तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. एकनाथ बोधले, महिला व बालकल्याण विकास अधिकारी समाधान नागणे, तालुका कृषी अधिकारी श्री मोरे तसेच ग्रामस्थ व लाभार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पंढरपूर शहरातील बियाणे व खत विक्री करणाऱ्या दुकानातून चोरीस गेलेले २,००,०००/रू बियाणे पोलिसांनी केले जप्त

# पंढरपूर शहर पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण शाखेची उल्लेखनीय कामगिरी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर शहरातील खत व बियाणे, शेती उपयोगी औषधे विक्री करणारे दुकानातून दिनांक३०/०५/२०२५ मका व कांद्याची बियाणे चोरी झाली असल्याचे पंढरपूर शहर पोलीस ठाण्यात गु.रा.न.३९४/२०२५भा.न्या.स.२०२३ चे कलम३०३(२)३,(५) प्रमाणे दिनांक१४/०६/२०२५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर चोरी करणाऱ्या सी.सी.टी.व्ही. फुटेज प्राप्त करून घेऊन अनेक ठिकाणची सीसीटीव्ही कॅमेरे चेक करून आरोपी कुठे राहण्यास आहे




सध्या त्यांचे वास्तव्य कुठे आहे हे गोपनीय माहिती घेतली असता ते सध्या घरी राहत नाहीत. सदर आरोपी ही पेरणी सुरू झाली की, अनेक ठिकाणी अशा प्रकारच्या चोऱ्या करतात अशी माहिती प्राप्त झाल्याने त्यासमोर अनुषंगाने गस्त करण्यात आले होते दिनांक१४/०६/२०२५ रोजी२१.०० च्या सुमारास दोन संशयित आरोपी मोटरसायकलवर मखावे कांदे बियाणे निम्मे किमती विकत असल्याचे असून पंढरपूर शहरांमध्ये फिरत आहेत अशी माहिती खात्रीशीर मिळाली असल्याने त्यांना मोटरसायकल सह ताब्यात घेऊन त्यांना पोलीस ठाण्यात आणून विश्वासात घेऊन सदर बियाणे बाबत विचारपूस के केलेल्या मुद्देमाल खालील प्रमाणे

१) १,००,०००/ रुपये किमतीचे पंचगंगा कंपनीचे दोन पेट्या पन्नास रुपये किमतीचे कांदा बियाणे

२)१,००,०००/ रुपये किमतीचे ड होंडा. कंपनीचे पाचपुते मका बियाणे वीस हजार रुपये किमतीचे मका बियाणे

असा एकूण२,००,०००/ रुपये किमतीचा कांदा व मका बियाणे जप्त करण्यात आले आहे.

सदर ची कामगिरी मा पोलीस अधीक्षक श्री अतुल कुलकर्णी, अप्पर पोलीस अधीक्षक श्री प्रीतम यावलकर, उपविभागीय पोलिस अधिकारी पंढरपूर विभाग अर्जुन भोसले, वरिष्ठ पोलीस निरीक्षक पंढरपूर शहर श्री विश्वजीत घोडके यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण शाखेने सह पोलीस निरीक्षक आशिष कांबळे, पोलीस हेडकॉन्स्टेबल सिग्मा गोडसे३९८,पो.हे.को.२२१ प्रसाद आवटी,पो.क, सचिन हेंबाडे विठ्ठल विभूते, निलेश कांबळे, शहाजी म्हणले समाधान माने, बजरंग बिचुकले, सायबर सोलापूरचे ग्रामीणचे पोलीस शिपाई रतन जाधव यांनी केली आहे.

# २०२५-२६ अंतर्गत राष्ट्रीय खाद्य तेल बिया गोदाम बांधकामाकरीताअर्ज करण्याचे आवाहन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/जिमाका : राष्ट्रीय खाद्यतेल अभियान-तेलबिया या नवीन अभियानाला मंजूरी दिली आहे. यात समुह आधारित कार्यक्रम राबविण्यातयेणार आहे. सदर अभियानांतर्गत सोयाबिन, करडई, सुर्यफुल या पिकांसाठी सोलापूर जिल्ह्याचीनिवड करण्यात आलेली आहे. प्रस्तुत योजनेअंतर्गत सोलापूर जिल्ह्याकरीता १ गोदाम बांधकामही बाब मंजूर आहे. या योजनेचा उद्देश गळीतधान्य उत्पादनाच्या सुरक्षित साठवणुक व मुल्यवृध्दी करणे.

पात्रतालाभार्थी- सरकारी, खाजगी उद्योग, शेतकरी उत्पादक संस्था, कंपनी (ऋझजड) आणि सहकारी संस्थाया घटकांतर्गत मदतीसाठी तउझ ला प्राधान्य देण्यात येईल. ज्या ठिकाणी गळीतधान्य पिकेघेतली जातात तथापी गोदामाची व्यवस्था नाही अशा ठिकाणी गोदाम बांधकामासाठी ही बाब राबविण्यातयेणार आहे. अभियानांतर्गत २५० मे.टन क्षमतेचे गोदाम बांधकाम करण्यासाठी प्रत्यक्ष खर्चाच्या५० टक्के किंवा रुपये १२.५० लाख यापैकी जे कमी असेल त्याप्रमाणे अनुदान अनुज्ञेय राहील. सदरबाब बँक कर्जाशी निगडीत असून इच्छुक अर्जदार संस्थेने केंद्र शासनाच्या डचठढ वखारमहामंडळ यांचे मार्गदर्शक सुचनांनुसार बँकेकडे प्रकल्प सादर करणे आवश्यक आहे. बँकेनेकर्ज मंजूर केल्यानंतरच संबंधित अर्जदार कंपनी सदर बाबीच्या लाभास पात्र राहील. अधिकमाहितीसाठी नजीकच्या कृषि कार्यालयाशी संपर्क साधावा असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषिअधिकारी शुक्राचार्य भोसले यांनी केले आहे.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# शासकीय महापूजेचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना मंदिर समितीकडून निमंत्रण

## सह. अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांची माहिती

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई /पंढरपूर : आषाढी शुध्द एकादशी रविवार दि. ०६ जुलै, २०२५ रोजी आहे. या दिवशी पहाटे २.२० वाजता मुख्यमंत्री महोदय व मानाचे वारकरी यांच्या हस्ते सपत्नीक श्री विठ्ठल-रुक्मिणीमातेची शासकीय महापूजा करण्यात येणार असून, महापूजेचे निमंत्रण मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांना आज दिनांक १७ जून रोजी वर्षा निवासस्थान, मुंबई येथे मंदिर समितीकडून देण्यात आल्याची माहिती मंदिर समितीचे सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी दिली.

यावेळी मंदिर समितीच्या सदस्या शकुंतला नडगिरे, संभाजी शिंदे, ह.भ.प. ज्ञानेश्वर देशमुख (जळगावकर), ड. माधवी निगडे, अतुलशास्त्री भगरे गुरुजी, ह.भ.प. प्रकाश जवंजाळ, ह.भ.प. शिवाजीराव मोरे व कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके उपस्थित होते.



यावेळी मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांचा मंदिर समितीच्या वतीने सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांच्या हस्ते विणा, वारकरी पटका, श्रींची मूर्ती, उपरणे, चिपळ्या देऊन सन्मान करण्यात आला.

यावेळी मुख्यमंत्री महोदयांना मंदिर समितीमार्फत आषाढी यात्रेच्या नियोजनाची करण्यात आलेली तयारी, श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर जतन व संवर्धन कामाची तसेच विठ्ठल रुक्मिणी मातेचे जलद व सुलभ दर्शन होण्याच्या दृष्टीने राबवण्यात आलेल्या टोकन दर्शन प्रणालीची माहिती मंदिर समितीचे सह.अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी यावेळी दिली.



# महिलांनी राजमाता जिजाबाईच्या कार्याचा आदर्श घ्यावा : मल्लिनाथ कल्याणशेट्टी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट : राजमाता जिजाबाई यांनी छत्रपती शिवाजी महाराजांना कौशल्याधिष्ठित शिक्षण देऊन त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास केला. स्वराज्याची स्थापना करण्यास प्रेरणा दिली. महिलांनी त्यांच्या कार्याचा आदर्श घेऊन आपल्या मुला मुलींना परिस्थितीनुसार घडविले पाहिजे. तरच उद्याच्या जगात ते सक्षमपणे वाटचाल करतील असे प्रतिपादन मल्लिनाथ कल्याणशेट्टी यांनी व्यक्त केले.

**कल्याणशेट्टी महाविद्यालयात राजमाता जिजाबाई यांच्या पुण्यतिथी निमित्त अभिवादन कार्यक्रम**

महर्षी विवेकानंद समाजकल्याण संस्था संचलित मातोश्री मातोश्री गुरूबसव्वा कल्याणशेट्टी महाविद्यालयातील इतिहास अभ्यास मंडळाने आयोजित केलेल्या अभिवादन कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी संस्थेचे सचिव मल्लिकार्जुन मसुती, मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी, प्राचार्य डॉ राजेंद्रसिंह लोखंडे उपस्थित होते.

पुढे ते म्हणाले की, राजमाता जिजाबाई यांच्याकडे अतुलनीय धाडस होते, बुद्धीचे वरदान त्यांना लाभले होते, आप्तस्वकीय शत्रु विरुद्ध लढत असताना स्वराज्यावर चालून आलेल्या शत्रूवर देखील मात केली पाहिजे अशी शिकवण त्यांनी छत्रपतींना दिली. आता देशाची परिस्थिती बदलली आहे. पाकिस्तान व चीन हे शत्रु राष्ट्र आपल्या देशाकडे वाकड्या नजरेने पाहत आहेत. त्यांच्या विरुद्ध आक्रमक पवित्रा घेण्याची वेळ आली आहे. अशा स्थितीत राजमाता जिजाबाईंचे विचारच प्रेरणा देणार आहेत. प्रारंभी मान्यवरांनी राजमाता जिजाबाई यांच्या प्रतिमेस अभिवादन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा डॉ शितल झिंगाडे यांनी केले, आभार प्रा मनीषा शिंदे यांनी मानले कार्यक्रमास प्रा शितल गायकवाड, शिल्पा धूमशेट्टी, हर्षदा गायकवाड, भीम सोनकांबळे, जनाबाई चौधरी उपस्थित होते.

# स्वेरीमध्ये स्पर्धा परीक्षेसंदर्भात मार्गदर्शन सत्र संपन्न




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील श्री.विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिटयूट संचलित कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग हे ऑटोनॉमस (स्वायत्त) दर्जा प्राप्त महाविद्यालय असून हे महाविद्यालय पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूरशी संलग्न आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी दर्जेदार तंत्रशिक्षण, संशोधन व कौशल्यविकास यांचा त्रिवेणी संगम साधणारे अग्रगण्य अभियांत्रिकी महाविद्यालय असून यामध्ये विविध शैक्षणिक उपक्रम, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर स्पर्धात्मक सहभाग, उद्योग क्षेत्राशी सशक्त सहकार्य तसेच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रभावी योजना नियमित राबविल्या जातात. यामुळे महाराष्ट्रातील आघाडीच्या अभियांत्रिकी शैक्षणिक संस्थांपैकी एक म्हणून राज्यभर याची स्वतंत्र निर्माण झाली आहे. याच पार्श्वभूमीवर स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अंतर्गत असलेल्या सिव्हिल इंजिनिअरिंग विभागामार्फत दि. ३१ मे २०२५ रोजी अंतिम वर्ष व पदवीपूर्व विद्यार्थ्यांसाठी 'प्लॅन, प्रिपेअर, परफॉर्म: अ रोड मॅप फॉर अस्पायरिंग सिव्हिल इंजिनिअर्स' या विषयावर अत्यंत उपयुक्त व प्रेरणादायी अशा करिअर मार्गदर्शन सत्राचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये स्वेरीचे माजी विद्यार्थी असलेले आणि सध्या प्रशासकीय सेवेत योगदान देत असलेले अधिकारी मिनाक्षी रोंगे, शुभम शिंदे आणि तेजश्री लेंडवे यांनी स्पर्धा परीक्षेबाबत विद्यार्थ्यांना बहुमोल मार्गदर्शन केले.

स्वेरीचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (ऑटोनॉमस)चे प्राचार्य डॉ.बी. पी.रोंगे यांच्या दिशादर्शक मार्गदर्शनाखाली, कॅम्पस इन्चार्ज डॉ. एम.एम. पवार यांच्या सहकार्याने व उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार यांच्या नेतृत्वाखाली आयोजिलेल्या 'स्पर्धा परीक्षेत करिअर करण्याविषयी मार्गदर्शन' या सत्राच्या उदघाटनानंतर प्रा. सी. आर. लिमकर यांनी स्वागत करून मार्गदर्शन सत्र आयोजित करण्याचा हेतू स्पष्ट केला. २०१७ बॅच मधून उत्तीर्ण असलेल्या स्वेरीच्या माजी विद्यार्थीनी मिनाक्षी महादेव रोंगे ह्या सध्या जलसंपदा विभागात सहाय्यक कार्यकारी अभियंता म्हणून काम पाहत आहेत. त्यांनी एमपीएससीच्या एमईएस -२०२३ या स्पर्धा परीक्षेत ८९ वा क्रमांक मिळविला असून त्यांनी 'स्पर्धा परीक्षेची तयारी कशी करावी हे सांगून अभ्यासाची दिशा आणि अशा वेळी आपली मानसिकता कशी असावी? यावर बहुमोल मार्गदर्शन केले. तसेच २०२१ साली स्वेरीच्या सिव्हिल इंजिनिअरिंग विभागातून उत्तीर्ण झालेले शुभम हरी शिंदे यांनी एमपीएससीच्या एमईएस -२०२३ या परीक्षेत १६ वा क्रमांक मिळविला असून उच्च तंत्रशिक्षण घेण्यासाठी अत्यंत अवघड असणारी गेट परीक्षा २ वेळा उत्तीर्ण झाले आहेत. त्यांनी पुढे आयआयटी, मुंबई मधून बांधकाम व्यवस्थापन पदविका घेतली. पुढे त्यांनी स्वेरीतील प्राणायाम, मार्गदर्शन सत्रे, गेट क्लासेस व फिल्ड व्हिजिट्स यामुळे त्यांचा अभ्यास कसा प्रभावी झाला हे सविस्तर स्पष्ट केले तसेच २०२२ साली स्वेरीच्या सिव्हिल इंजिनिअरिंग विभागातून उत्तीर्ण झालेल्या तेजश्री भारत लेंडवे यांनी एमपीएससी च्या एमईएस -२०२३ या परीक्षेत महिला गटात दुसरा क्रमांक मिळविला तर दोन वेळा गेट परीक्षा उत्तीर्ण झाल्या आहेत. सध्या तेजश्री लेंडवे ह्या जलसंपदा विभागात सहाय्यक अभियंता म्हणून कार्यरत आहेत. त्यांनी आपल्या महाविद्यालयीन काळातील शिक्षकांचे मार्गदर्शन, प्रोत्साहन व मार्गदर्शक संवाद याच्या योगदानामुळे आपण स्पर्धा परीक्षेत यशस्वी होत असल्याचे सांगून स्पर्धा परीक्षेची तयारी करताना नेमके कोणत्या विषयावर फोकस केला पाहिजे याबाबत मार्गदर्शन केले. यावेळी विद्यार्थ्यांनी स्पर्धा परीक्षेबाबत प्रश्न विचारले. यावर मिनाक्षी रोंगे, शुभम शिंदे आणि तेजश्री लेंडवे यांनी समाधानकारक व अभ्यासपूर्ण उत्तरे दिली. या मार्गदर्शन सत्रात विशेष अतिथी म्हणून मुंबई मधील फोसरॉक केमिकल्स कंपनीचे संशोधन आणि विकास विभागाचे राम पंत यांनीही मार्गदर्शन करताना म्हणाले की, 'उत्तम अभियंता होण्यासाठी सर्वप्रथम चांगला माणूस होणे आवश्यक आहे. चांगला माणूस बनण्यासाठी समोरच्या माणसाची भावनिकता, मानसिकता परिस्थिती यांचा अभ्यास करून त्यावर चांगल्या पद्धतीने मार्गदर्शन करता येवू शकते. यासाठी अभियंता होण्यापूर्वी माणूस बनणे महत्वाचे आहे. असे सांगून त्यांनी सहकार क्षेत्रात आपले कसे वर्तन असावे' यावर सुंदर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे समन्वयक म्हणून प्रा. पी. व्ही. केळकर यांनी काम पाहिले. यावेळी सिव्हिल इंजिनिअरिंगच्या विभागप्रमुख डॉ. एस. पी. पाटील, डॉ. एम.जी. देशमुख, प्रा. पूजा रोंगे यांच्यासह सिव्हिल इंजिनिअरिंग विभागातील प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी वर्ग व विद्यार्थी उपस्थित होते.

**स्वेरीचे माजी विद्यार्थी मिनाक्षी रोंगे, शुभम शिंदे आणि तेजश्री लेंडवे यांनी दिला कानमंत्र**

# वागदरी ग्रा.प. कडून इ.१० वी १२ वी उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा सत्कार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागारी/प्रतिनिधी : तुळजापूर तालुक्यातील मौजे वागदरी येथिल इं.१० वी व १२ वी उत्तिर्ण विद्यार्थां चा येथिल ग्राम पंचायतीच्या वतीने सत्कार करण्यात आला.

शालेय व महाविद्यालयिन विद्यार्थ्यांना पुढील शिक्षणासाठी प्रेरणा मिळवी म्हणून ग्राम पंचायत वागदरी च्या वतिने मार्च २२५ मध्ये घेण्यात आलेल्या इ. १० वी व १२ वी बोर्ड परिक्षेत वागदरी येथिल उत्तिर्ण विद्यार्थ्यांच्या सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते.




या प्रसंगी विद्यामान सरपंच तेजाबाई शिवाजी मिटकर, उपसरपंच सुरेखा भालचंद्र यादव, ग्रामसेवक एम. एम. तांबोळी, ग्रा.प.सदस्य ज्ञानेश्वर पाटील, अमोल पवार, मिनाक्षी बिराजदार,मुक्ताबाई बिराजदार,सह उपस्थित मान्यवरांच्या हस्ते पुष्प हार घालून व पेढा भरवून उत्तिर्ण विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सुत्र संचलन माजी उपसरपंच दत्ता सुरवसे यानी केले. यावेळी भाजपा बुथ प्रमुख मदनराजे पाटील, भाजपा मिडीयासेल तालुका प्रमुख किशोर धुमाळ, रिपाइं (आठवले ) चे एस.के. गायकवाड, रोजगार सेवक रामसिंग परिहार, जेष्ठ कार्यकर्ते कल्याण मिटकर, काशीनाथ सोमवंशी नागनाथ चव्हाण, सिआरपी विद्या बिराजदार, उज्वला वाघमारे, सुष्मा वाघमारे, अशा कार्यकर्ती पार्वती बिराजदार, अंगणवाडी कार्यकर्ती पद्मिनीबाई पवार, ग्रा. प.कर्मचारी ओंकार चव्हाण, सर्जेराव चव्हाण, अकाश झेंडारे उपस्थित होते.

# तांबरवाडी राजेवाडी जिल्हा परीषद केंद्रीय प्राथमिक शाळेत विद्यार्थी स्वागत

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

औसा प्रतिनिधी/अमर जाधव : आज जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा तांबरवाडी राजेवाडी या शाळेमध्ये इयत्ता पहिली वर्गातील नवगताचे नवविद्यार्थ्यांचे स्वागत करुन शाळेतील पहिलं पाऊल,शाळेत पडताच त्यांच्या पायाचे ठसे घेत पुस्तक वाटप गणवेश वाटप ,एक वृक्ष माँ के नाम उपक्रम घेण्यात आले.यावेळी शालेय समितीचे अध्यक्ष विक्रम बिराजदार, राजकुमार जाधव ,रवी मडजे, मुख्याध्यापक देशमाने, राजेवाडी मुख्याध्यापक आशा मेह्त्रे, बालाजी माने, मारुती बिराजदार, बालीका मुगळे,



सवीता पारशेवार, महानंदा सुर्यवंशी. सुनिता वेदपाठक, राधा बिराजदार, सह विद्यार्थी पालक व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी उपस्थीत होते.

**प्रांताधिकारी सचिन इथापे यांचे आवाहन**

**दि. १६ जून पासून प्लॉट नोंदणी झाली सुरू**

# आषाढी यात्रा सोहळा; पालखी सोहळा, दिंडीधारकांनी आगाऊ प्लॉटसची मागणी नोंदवावी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : आषाढी यात्रा एकादशीचा मुख्य सोहळा दि. ०६ जुलै २०२५ रोजी साजरा होत असून, यात्रा कालावधी २६ जून ते १० जुलै २०२५ असा आहे. या यात्रेत येणाऱ्या शेकडो दिंड्यांना वास्तव्यासाठी भक्तीसागर (६५ एकर) येथे जागा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. या ठिकाणी मोफत प्लॉटस भाविकांना तंबू, राहुट्या उभारुन वास्तव्य करण्यासाठी देण्यात येत आहेत. प्रथम येणाऱ्या पालखी, दिंडी धारकांना प्रथम प्राधान्य देण्यात येणार असून, दि.१६ जून पासून प्लॉट नोंदणी सुरु करण्यात आली आहे. संबधितांनी भक्तीसागर येथे आगाऊ प्लॉटची मागणी नोंदवावी, असे आवाहन प्रांताधिकारी सचिन इथापे यांनी केले आले आहे.

आषाढी यात्रेला येणाऱ्या पालखी सोहळ्या सोबत येणाऱ्या दिंड्यांमधील भाविकांच्या निवाऱ्याची सोय भक्तीसागर (६५ एकर) येथे करण्यात आलेली आहे. या ठिकाणी भाविकांना निवाऱ्यासोबत पिण्याचे शुद्ध पाणी, शौचालय, वीज कनेक्शन, अन्नपदार्थ शिजवण्यासाठी गॅस वितरण, पोलीस संरक्षण, प्रथमोपचार केंद्र आदी सुविधा या ठिकाणी दिल्या जातात. त्यामुळे या ठिकाणी भाविकांची प्रचंड गर्दी होते. या ठिकाणी एकूण ४९७ प्लॉट्स भाविकांना निवाऱ्यासाठी दिले जातात. या ठिकाणी भाविकांच्या अडीअडचणी सोडवण्यासाठी आपत्कालीन मदत केंद्र स्थापन करण्यात येते. येथे प्रशासकीय यंत्रणा सुसज्ज व सुरळीतपणे काम करण्यासाठी तहसीलदार सचिन मुळीक यांची सेक्टर मॅनेजर म्हणून नियुक्ती केली आहे.भाविकांना प्लॉटस वाटप करणे, अडीअडचणी सोडवणे, आपत्कालीन प्रतिसाद केंद्र व त्यावर नियुक्त सेक्टर मॅनेजर व त्याचे अधिनस्त कर्मचारी कार्यान्वित असणार आहेत.

दिंडी, पालखी समवेत येणाऱ्या भाविकांना भक्तीसागर ६५ एकर येथे प्लॉटसचे वाटप करण्यात येणार आहे. आषाढी एकदशीच्या सोहळ्या अगोदर दिंडी, पालखीतील भाविकांने प्लॉटसाठी मागणी करणे आवश्यक आहे. त्यामुळे प्रथम येणाऱ्यांना प्राधान्य देण्यात येणार आहे. या ठिकाणी भाविकांना मुलभूत सेवासुविधा पुरवण्यात येणार असून आपत्कालीन प्रतिसाद केंद्रातून भाविकांना सेवा देण्यात येणार आहे. यासाठी नायब तहसिलदार सुधाकर धाईंजे (मो.क्र.९७६७२४८२१०), तसेच ग्राम महसूल अधिकारी दादासाहेब पाटोळे (मो.क्र.९९७०१०९९१९), प्रमोद खंडागळे (मो.क्र. ९६५७२९०४०३) तसेच वैभव कट्टे (मो.क्र.९६६५०७६०६६) यांच्याकडे संपर्क साधावा, असे आवाहनही प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.



# ७० फुट भाजी मंडईवरील कारवाईमुळे सुमारे २०० विक्रेते बेरोजगार होण्याच्या संकटात - विक्रेत्यांनी पालकमंत्र्यांना साद घातली

## कॉ.आडम मास्तरांनी रात्री १०:३० सोलापूर रेल्वे स्थानकावर पालकमंत्री गोरे यांना दिले निवेदन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : सोलापूर महानगरपालिकेच्या अतिक्रमण विभागाने ७० फुट भाजी मंडई परिसरात सुरू केलेल्या कारवाईमुळे गेल्या २० दिवसांपासून भाजीपाला, फळे, व अन्य जीवनावश्यक वस्तूंची विक्री ठप्प झाली आहे. महानगरपालिका नियमांचे उल्लंघन झाल्याचे कारण पुढे करत प्रशासनाने या भागातील चारचाकी फेरीवाले, फळ विक्रेते आणि हातगाडीधारकांविरुद्ध जप्ती आणि पोलिस बंदोबस्तात प्रतिबंधात्मक कारवाई सुरू ठेवली आहे.

या निर्णयाचा निषेध करत ११ जून रोजी विक्रेत्यांनी आपल्या कुटुंबांसह मोर्चा काढून मनपा आयुक्त कार्यालयावर धडक दिली. शिष्टमंडळाने निवेदनाद्वारे आयुक्तांना आपली कैफियत सांगितली, परंतु कोणताही ठोस निर्णय न घेतल्यामुळे विक्रेत्यांमध्ये संताप आहे. परिस्थिती हाताबाहेर जात असल्याने विक्रेत्यांचे शिष्टमंडळ १६ जून रोजी रात्री १०:३० वाजता सोलापूर रेल्वे स्थानकावर जिल्ह्याचे पालकमंत्री मा. जयकुमार गोरे यांना निवेदन देण्यासाठी भेटले.

साहेब, यांना जगू द्या - यांच्या मरणाची वाट पाहू नका! या भावनिक आवाहनासह आत्महत्येच्या उंबरठ्यावर पोहोचलेल्या विक्रेत्यांनी पालकमंत्र्यांकडे हस्तक्षेपाची मागणी केली.

या निवेदनानंतर सोमवार, १६ जून रोजी सीटू संलग्न लाल बावटा फेरीवाले, चारचाकी व खोकेधारक श्रमिक संघटनेच्या वतीने ज्येष्ठ नेते व माजी आमदार कॉ. नरसय्या आडम मास्तर यांच्या नेतृत्वाखाली पुन्हा एकदा पालकमंत्र्यांना सविस्तर निवेदन देण्यात आले. यावेळी अक्कलकोटचे आमदार सचिन कल्याणशेट्टी यांचीही उपस्थिती होती. शिष्टमंडळात खाजाभाई करजगी, रुक्मिणी कवळे, गणेश वाघमारे, चांद शेख, जाफर शेख, सादिक बागवान, मल्लय्या खरात, रियाज पठाण, बबलू बागवान आदींचा समावेश होते.

### पालकमंत्र्यांची सकारात्मक भूमिका

**निवेदन स्विकारल्यानंतर मा. पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी या प्रकरणात सकारात्मक निर्णय घेण्याची ग्वाही दिली असून, लवकरच संबंधित विभागांशी चर्चा करून तोडगा काढण्यात येईल, असे आश्वासन दिले.**

**स्वयंरोजगारावर अवलंबून असलेल्या गरीब विक्रेत्यांचे भविष्य अधांतरी**

शिष्टमंडळाने स्पष्ट केले की, विडी, यंत्रमाग, रेडीमेड शिलाई, व बांधकाम क्षेत्रातील मंदीमुळे सोलापूरमध्ये रोजगार संधींमध्ये मोठी घट झाली आहे. स्थलांतराच्या वाढत्या लाटेमध्ये हजारो कामगारांचे जीवन अस्थिर झाले असून, अशा काळात फेरीवाले, भाजीपाला व फळ विक्रेते हे आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करण्यासाठी स्वतःच्या हिमतीवर व्यवसाय करत आहेत.

७० फुट भाजी मंडई हे ठिकाण शहराच्या मध्यवर्ती आणि उपयुक्त भागात असून चाळीस वर्षांपासून येथे व्यवसाय सुरू आहे. वाहतुकीस अडथळा न होता ग्राहकांना ताजे व दर्जेदार जीवनावश्यक पदार्थ उपलब्ध करून देणारे हे विक्रेते समाजासाठीही अत्यंत गरजेचे आहेत.

**विक्रेत्यांची मागणी – अधिकृत मान्यता द्या, अडचण नको**

शिष्टमंडळाची मागणी आहे की, ७० फुट भाजी मंडई येथे विक्रेत्यांना नियम व अटी लागू करून वाहतुकीस अडथळा न होता परवानगीने व्यवसाय करण्याची मान्यता द्यावी. अतिक्रमण विभागाची कारवाई तत्काळ थांबवून विक्रेते, आयुक्त व संबंधित विभाग यांची संयुक्त बैठक घेऊन स्थायी तोडगा काढावा.



# वेध लोहा न.प. निवडणुकीचे; भावी नगरसेवक लागले कामाला....!



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

लोहा / शिवहार गालफाडे :

लोहा नगरपालिकेची मागील निवडणूक ९ डिसेंबर २०१८ मध्ये झाली होती.आणि निकाल १० रोजी लागला होता. भाजपाचे लोकनियुक्त नगराध्यक्ष यांच्या सह१३ नगरसेवक भाजपाचे व काँग्रेसचे ०४ नगरसेवक असे एकूण १७ नगरसेवकासह जनतेतून लोकनियुक्त नगराध्यक्ष निवडून आले होते.

ओबीसी आरक्षणाचा मुद्दा सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असल्यामुळे निवडणूक लांबली होती. पण आता सर्वोच्च न्यायालयाकडून आगामी चार महिन्यात स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका घेण्यासंदर्भात राज्य शासनाला आदेशित केल्यामुळे निवडणुकीचा मार्ग सुकर झाला आहे. प्रशासनाकडून आगामी निवडणूक घेण्यासाठी तयारी सुरू केली असून लोहा शहरात आता निवडणुकीचे वारे जोरात वाहू लागले आहे.

शहरातील नागरिकांसाठी नगरपरिषदेची निवडणूक जितकी महत्त्वाची असते तितकीच विविध राजकीय पक्षासाठी ही निवडणूक महत्त्वाची असते. निवडणुकीची चाहूल लागताच पक्षीय नेत्यांकडून ग्रीन सिग्नल मिळालेल्या भावी (लोकप्रतिनिधी) नगरसेवकां कडून नागरिकांची काळजी घ्यायला सुरुवात झाली आहे हे भावी लोकप्रतिनिधी प्रत्येक लग्नसमारंभामध्ये व इतर धार्मिक- सामाजिक कार्यक्रमांमध्ये आवर्जून उपस्थित राहत असल्याचे चित्र दिसत आहे. आगामी निवडणुका डोळ्यासमोर ठेवूनच त्यांनी मतदारांच्या गाठीभेटी वाढवल्याआहेत जनतेसाठी आपणच कसे सक्षम उमेदवार आहोत हेही पटवून देण्यास चालू केले आहे. त्यामुळे जनतेमध्ये भावी नगरसेवक हे चर्चेचा विषय ठरत आहेत. आणि भावी नगरसेवक लागले कामाला असे जनतेतून बोलल्या जात आहे.

# जिल्हा अध्यक्ष भगवान चंदे उत्कृष्ट संघटक पुरस्काराने सन्मानित

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव :महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई चे मराठवाडा विभागीय अधिवेशन नुकताच यशस्वी रित्या पार पडले. संघाचे संस्थापक अध्यक्ष तथा राज्य संघटक संजयजी भोकरे, प्रदेशाध्यक्ष गोविंद वाकडे, राज्य सरचिटणीस विश्वासराव आरोटे, राज्य प्रसिद्धी प्रमुख नवनाथ जाधव,मराठवाडा विभागीय अध्यक्ष यांच्या मार्गदर्शनाखाली भिवंडी तालुक्यातील महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे ठाणे जिल्हा अध्यक्ष भगवान चंदे यांना नुकतेच महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई मराठवाडा विभागाच्या वतीने पत्रकार संघाचे मराठवाडास्तरीय रौप्य महोत्सवी २०२५ व्या अधिवेशनात छत्रपती संभाजी नगर, संत एकनाथ रंगमंदिर, उस्मानपुरा येथे महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे ठाणे जिल्हा अध्यक्ष भगवान चंदे यांना सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांच्या हस्ते उत्कृष्ट संघटक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. झालेल्या अधिवेशनात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या पत्रकार, समाजसेवक, बिजनेसमन, लोकप्रतिनिधी यांना देखील पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

गेल्या २५ वर्षापासून पत्रकारिता करणाऱ्या भगवान चंदे यांनी सहा वर्षापूर्वी संघटनेत प्रवेश केला आणि संघटनेच्या ठाणे जिल्हा अध्यक्ष पदावर नियुक्ती झाली ती सलग चार वर्ष लोकशाही पद्धतीने बिनविरोध निवडून आले आहेत. त्यांच्या कामाची पद्धत, नियोजन बद्ध उपक्रम, समाजसेवेची आवड, आणि संघटनेची जडण घडण यामध्ये सहभागी होऊन निस्वार्थी चालविलेल्या कारभारावर वरिष्ठांनी खुष होऊन भगवान चंदे यांना उत्कृष्ट संघटक म्हणून गौरविण्यात आले.

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई अंतर्गत ठाणे जिल्ह्यातील अनेक ठिकाणी त्यांचे सामाजिक उपक्रम पार पडले आहेत .मुरबाड तालुक्यात ५१ शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप केले.शालेय विद्यार्थ्यांना मुरबाड तालुक्याचा इतिहास स्मरणात रहावा यासाठी तालुक्याचे वैशिष्ट्य मुखपृष्ठावर छापण्यात आले.तर आशिया खंडातील चर्चेतील आजीबाईचा शाळेतील ६५ ते ९२ वर्षाची आजी शाळेत पाहून कुणालाही नवल वाटेल. त्या आजी बाईंना मिठाई हलवा वाल्या कंपास, पेन , पॅड, देण्यात आले.भिवंडीतलुक्यातील अंबाडी येथे स्थलांतरित मजुरांना धान्य वाटप,(तांदूळ, चणाडाळ, गुळ) भिवंडी तालुक्यातील गुणवंत, विद्यार्थी,यशस्वी कामगार,आदर्श शिक्षक पुरस्कार,तर मुंबई नाशिक महामार्गावरील अपघात पाहता पडघे येथे ५०० हेल्मेट वाटप करून जनतेच्या आरोग्याची काळजी घेतली.कोरोना कळत मानकोली ते कसारा पोलिस बांधवांना कोरोना किट देण्यात आले. तर जिल्ह्यातील २५० पत्रकार बांधवांना किरण साहित्याचे वाटप करून जनसेवेचे व्रत चालविले.कल्याण तालुक्यातील रायते व गोवेळीतील गुणवंत विद्यार्थी सत्कार, आणि शैक्षणिक साहित्य वाटप असे विविध उपक्रम राबवून सामाजिक बांधिलकी जपली आहे. तसेच शहापूर तालुक्यातील शेकडो विद्यार्थी पोलिस कामगार यांना तर झेड पी चे आसनगाव, कसारा, शहापूर मुरबाड.,येथे.छत्रीचे वाटप. असा अभिनव उपक्रम राबविण्यात ठाणे जिल्हा राज्यात अग्रस्थानी आहे.



संघाच्या सर्व पत्रकारांची वृत्तांकनाची समस्या लक्षात घेऊन त्यांना पावसाळी रेनकोट देण्यात आघाडीवर राहिला तो ठाणे जिल्हा. संभाजीनगर येथील राज्य स्तरीय अधिवेशनात उत्कृष्ट संघटक पुरस्काराने सन्मानित केले ते ठाणे जिल्ह्याचे अध्यक्ष भगवान चंदे.यावेळी नितीन शिंदे पश्चिम महाराष्ट्र राकेश खराडे (रायगड) भगवान चंदे( ठाणे) किशोर रायसकड (जळगाव) नीलेश सोमाणी( वासिम ) नयन मोढे (अमरावती) अनुपम कुमार भार्गव (वर्धा) गणेश सुरजसे (अकोला) स्वामीराज गायकवाड(नाशिक) राजेंद्र कोरके पाटील (सोलापूर) जितेंद्र सिंह रजपूत (उत्तर महाराष्ट्र ) दशरथ चव्हाण (नवीमुंबई ) चंद्रकांत पाटील (कोल्हापूर) संतोष पडवळ (ठाणे शहर) संजय फुलांदर (अकोले) दत्ता गाडगे (अहिल्यानगर) लक्ष्मण डोळस (नाशिक) दत्तात्रय राऊत (जामखेड) महाराष्ट्रातील संघाचे जिल्हाध्यक्ष आणि पत्रकार यांना उत्कृष्ट संघटक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

यावेळी ठाणे जिल्हा अध्यक्ष भगवान चंदे यांच्यासोबत जिल्हा सहसचिव मिलिंद जाधव,कल्याण तालुका अध्यक्ष योगेश गोडे,मुरबाड तालुका अध्यक्ष शेखर भोईर पत्रकार अनंत घागस, भगवान जाधव,समीर वेखंडे आदी उपस्थित होते.तर पुरस्कार मिळाल्या बद्दल सर्वच स्तरातून महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे ठाणे जिल्हा अध्यक्ष भगवान चंदे यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत असून त्यांचे कौतुक केले जात आहे.

**अग्निशमनवर फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया सोलापूर शाखेच्या कर्मचाऱ्यांची कार्यशाळा संपन्न**

# फॅमिली प्लॅनिंगच्या कर्मचाऱ्यांनी गिरवले अग्निक्षमणचे धडे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/प्रतिनिधी : श्री. बालाजी फायर सर्व्हिसेस यांच्यावतीने रंगा चौक, बुधवार बाजार येथील फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया सोलापूर शाखेच्या पद्मावती क्लिनिक मध्ये कर्मचाऱ्यांकरिता अग्नीक्षमण याविषयावर एक दिवसीय प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या प्रशिक्षण शिबिरात श्री. बालाजी फायर सर्विसेसचे अधिकारी गिरीशचंद्र वासल यांनी व सहाय्यक अधिकारी अशोक येरजम यांनी मार्गदर्शन केले.

प्रशिक्षण शिबिरात श्री. बालाजी फायर सर्विसेस यांनी आगीचे प्रकार, अग्नि त्रिकोण, जोखीम आणि धोका, अग्निशामक यंत्र, अग्निशमन यंत्र कसे वापरावे, आग विझवण्यासाठी कोणता वायू वापरला जातो, आग वीझवण्यासाठी लागणारे फायर ईस्टिंगविशरचे टाईप वर्गीकरण यात प्रामुख्याने वर्ग : सामान्य ज्वलनशील पदार्थाची आग, वर्ग इ : ज्वलनशील द्रव्य पदार्थां, वर्ग उ : ज्वलनशील वायू पदार्थांचा व वर्ग ऊ: ज्वलनशील धातू याविषयी शास्त्रोक्त माहिती दिली. प्रशिक्षणाच्या शेवटी सर्व कर्मचाऱ्यांकडून फायर ईस्टिंगविशरच्या सहाय्याने आग विझवण्याचे प्रात्यक्षिक करून घेतले.

या प्रशिक्षण शिबिरात फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया सोलापूर शाखेचे शाखाधिकारी सुगतरत्न गायकवाड, कार्यक्रम अधिकारी वीरेंद्र परदेशी, वैद्यकीय अधिकारी डॉ. कविता चंडक, अकाउंटस ऑफिसर व्यंकटेश मच्छा, लॅब टेक्निशन व्यंकटेश कंची, कार्यालयीन सहाय्यक अर्चना पारशेट्टी, अधीपरिचारिका रोजमेरी गायकवाड, सुकेशनी सोनकांबळे, सुदुरसेवा विभाग कर्मचारी आकाश गायकवाड, कल्पना गडगडे, प्रिसिजन फाउंडेशन संचलित सर्वांकष लैंगिकता शिक्षण प्रकल्प कर्मचारी




सत्यभामा कांबळे, स्वप्निल सोनवणे, विकी शिवशरण, शिपाई दिनकर बनसोडे, लक्ष्मी पारवे आदी कर्मचाऱ्यांनी सक्रिय सहभाग घेतला होता.

सुरुवातीला साधारण व्यक्तींचे स्वागत विकी शिवशरण यांनी केले. प्रास्ताविक आकाश गायकवाड यांनी केले. सूत्रसंचालन वीरेंद्र परदेशी यांनी केले तर आभार स्वप्नील सोनवणे यांनी मानले.

# सोलापूर येथील सैनिकी मुलां, मुलींचे वसतिगृहात प्रवेशबाबत आवाहन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/जिमाका : जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, सोलापूर यांचे अधिपत्याखाली सुंदरमनगर, विजापूर रोड, सोलापूर येथे सैनिक मुला, मुलींचे वसतिगृह असून, आजी, माजी सैनिकांच्या पाल्यांना येथे सवलतीच्या दरात निवास व भोजनाची सुविधा उपलब्ध आहे. तसेच माजी सैनिक विधवा पत्नीचे पाल्य, शहीद सैनिकांच्या पाल्यांना व सैनिकांच्या अनाथ पाल्यांना वसतिगृहामध्ये नि:शुल्क भोजनाची व निवासाची सोय उपलब्ध आहे. इच्छुकांनी वसतिगृह अधिक्षक, अधिक्षीका यांचेकडून प्रवेश पुस्तिका, अर्ज घेऊन त्यांनी दिनांक ३० जून २०२५ पर्यंत सैनिकी मुलां, मुलींचे वसतिगृह अधिक्षक, अधिक्षीका यांचेकडे अर्ज सादर करावेत असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी मिलिंद तुंगार यांनी केले आहे

आजी,माजी सैनिकांचे तसेच सैनिक विधवांचे व शहीद सैनिकांचे पाल्य सोलापूर येथील शैक्षणिक संस्थेत इयत्ता ८ वी ते पुढील पदव्युत्तर अभ्यासक्रमाचे शिक्षण घेत आहेत आणि जे वसतिगृहात प्रवेश घेऊ इच्छितात त्यांनी अर्ज सादर करावेत तसेच वसतिगृह माहे जुलै २०२५ पासून सुरू करण्याचे प्रस्तावित आहे. तसेच खाजगी शिकवणीमध्ये प्रवेश घेतलेल्या माजी सैनिकांच्या पाल्यांचे सैनिकी मुलां, मुलींच्या वसतिगृहामध्ये प्रवेश हा प्रथम प्राधान्य म्हणून पाल्याला प्रवेश त्याच जिल्ह्यात, शहरात शाळा किंवा महाविद्यालयामध्ये घेतलेला असावा व तदनंतर द्वितीय म्हणून खाजगी शिकवणीमध्ये प्रवेश घेतलेल्या पाल्यांनाही देण्यात येईल.

वरील प्रवेश प्रक्रियेमध्ये सैनिकांच्या पाल्यांना प्राधान्य देण्यात येईल. वसतिगृहात जागा उपलब्ध असल्यास इतर नागरी पाल्यांचा प्रवेशासाठी विचार करण्यात येईल. तसेच दिनांक ८ जूलै २०२५ रोजी सकाळी १०.०० वाजता प्रवेश बैठक आयोजित केली असून प्रवेश अर्ज सादर केलेल्या पाल्यांनी त्यांचे पालकासह प्रवेश प्रक्रियेसाठी संबंधित सर्व कागदपत्रासह उपस्थित रहावे. अधिक माहितीसाठी मुलींचे वसतिगृह ०२१७- ७२३०१७७८, ९५२७५८४०३४ व मुलांचे वसतिगृह ०२१७- ७२३०२२२८, ९८९०७६८९६५ या क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी मिलिंद तुंगार यांनी केले आहे.